साप्ताहिक

# सामाजिक आढावा

PRGI No.: MHMAR/25/A3777 E-mail : samajikaadhawa@gmail.com

वर्ष : 1 ले, अंक : 2 शनिवार, दिनांक : 13 डिसेंबर 2025 ते 19 डिसेंबर 2025 संपादक : विनायक विलास कालेकर मूल्य : 5 रूपये पाने 4







डॉ. बाबा आढाव

## ज्येष्ठ समाजसेवक डॉ. बाबा आढाव यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

### डॉ. बाबा आढाव यांचे कष्टकरी, श्रमिक, गरीब, वंचित वर्गाकरिता संपूर्ण आयुष्य समर्पित– उपमुख्यमंत्री अजित पवार

ज्येष्ठ समाजसेवक डॉ. बाबा आढाव यांच्यावर दि. ९ डिसेंबर २०२५ रोजी वैकुंठ स्मशानभुमी, नवी पेठ येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. शासनाच्यावतीने उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी त्यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेतले, पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.

यावेळी माजी गृहमंत्री मंत्री अनिल देशमुख, माजी राज्यमंत्री रमेश बागवे, माजी आमदार मोहन जोशी, चेतन तुपे, पोलीस उपायुक्त कृषिकेष रावल, उपविभागीय अधिकारी विठ्ठल जोशी, पुणे शहर तहसीलदार स्मिता माने, हवेली तहसीलदार अर्चना निकम यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

श्री. पवार म्हणाले, डॉ. बाबा आढाव यांनी खऱ्या अर्थाने कष्टकरी, श्रमिक, गरीब, वंचित आदी वर्गाकरिता संपूर्ण आयुष्य समर्पित केले. रिक्षा पंचायत, हमाल पंचायत, माथाडी, असंघटित कामगारांच्या प्रसंगात त्यांना कठोर भूमिका घ्यावी लागली. ते विचार घेऊन ते शेवटच्या श्वासापर्यंत आयुष्य जगले.

छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची विचारधारा स्मरणात ठेवून त्यादृष्टीने वाटचाल केली, एक संघर्ष योद्धा म्हणून त्यांना भारतासह महाराष्ट्राने अनुभवले आहे, अशा शब्दात श्री. पवार यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

यावेळी उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी यांनी बाबा आढाव यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. बाबा आढाव यांच्या पत्नी शीलाताई आढाव, मुलगा असीम आढाव, अंबर आढाव आदी उपस्थित होते.

## आशियातील सर्वात मोठे ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर महाराष्ट्रात उभारण्यात येणार– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**एमएमआरडीए आणि ब्रुकफिल्ड कंपनी यांच्या संयुक्त नेतृत्वात प्रकल्प उभारणार**

महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील प्रतिभा, पायाभूत सुविधा आणि व्यवसाय–अनुकूल वातावरण या तीन घटकांमुळे महाराष्ट्र ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटरसाठी अग्रगण्य ठरत आहे. यावर्षी जाहीर केलेले नवीन GCC धोरण राज्यात उच्च मूल्याच्या, कौशल्याधारित रोजगारनिर्मितीस प्रोत्साहन देईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सांगितले.

ब्रुकफिल्ड कंपनीने मुंबईतील पवई येथे ६ एकर जागेवर २० लाख चौरस फूट भाडेतत्वावरील बांधकाम असलेला भव्य प्रकल्प उभारण्याची घोषणा केली आहे. या अंतर्गत बहुराष्ट्रीय बँकेचे आशियातील सर्वात मोठे ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर (GCC) स्थापन केले जाणार आहे. हा करार २० वर्षांच्या कालावधीसाठी करण्यात आला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, या मोठ्या प्रकल्पांमुळे महाराष्ट्राच्या प्रगतीबाबत जागतिक स्तरावर विश्वास दृढ झाला आहे. आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या भविष्यातील गरजा पूर्ण करण्याबरोबरच, स्थिर आणि सक्षम वातावरण पुरवण्यास राज्य शासन तत्पर आहे. सदर प्रकल्प २०२९ पर्यंत पूर्ण होणार असून, यामध्ये १ अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक गुंतवणूक अपेक्षित आहे तसेच ३०,००० हून अधिक रोजगार निर्मिती होणार आहे. हा प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) व ब्रुकफिल्ड यांच्या नेतृत्वाखाली भागीदार बी. एस. शर्मा यांच्या सहकार्याने राबविण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री म्हणाले की, ही उभारणी महाराष्ट्रातील गुंतवणूकदार–अनुकूल वातावरणाबाबत जागतिक कंपन्यांचा वाढता विश्वास अधोरेखित करणारी आहे. प्रकल्पासाठी १०० टक्के हरित उर्जेचा वापर करण्याचे उद्दिष्ट असून इमारत बाजारातील सर्वोत्तम शाश्वत बांधकाम मानकांनुसार उभारली जाणार आहे. यामुळे मुंबईचे ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर हब म्हणूनचे स्थान आणखी मजबूत होणार आहे.

२०२४ मध्ये ब्रुकफिल्डने पुण्यात एका मोठ्या वित्तीय सेवा कंपनीसाठी 'बिल्ड–टू–सूट' टॉवर उभारला होता. याच वर्षी MMRDA सोबत १२ अब्ज डॉलर्सच्या गुंतवणुकीचा सामंजस्य करार करण्यात आला. जून २०२५ मध्ये कंपनीने बांद्रा–कुर्ला संकुलात २.१ एकर जागा खरेदी केली आहे.

ब्रुकफिल्डचे वरिष्ठ गुंतवणूक अधिकारी अंकुर गुप्ता म्हणाले , आशिया खंडातील कार्यालय विकास क्षेत्रात नवा मापदंड ठरेल असा हा आयकॉनिक प्रकल्प आम्ही उभारत आहोत. मुंबईत करण्यात आलेली गुंतवणूक आता ४ अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक झाली आहे. उच्च दर्जाची, शाश्वत आणि आधुनिक कार्यस्थळे निर्माण करण्यासाठी ब्रुकफिल्ड कटिबद्ध आहे.

ब्रुकफिल्ड ही भारतातील सर्वात मोठ्या कार्यालयीन मालक आणि ऑपरेटर कंपन्यांपैकी एक असून देशातील सात शहरांमध्ये सुमारे ५५ दशलक्ष चौरस फूट क्षेत्राचे व्यवस्थापन करते. उच्च दर्जाच्या, ग्रेड–अ प्रकल्पांची विकास व संचालन क्षमता कंपनीने सातत्याने सिद्ध केली आहे. पवईतील प्रस्तावित प्रकल्पाला उत्कृष्ट कनेक्टिव्हिटी, सामाजिक सुविधा व मोठ्या प्रमाणातील कुशल मनुष्यबळाचा लाभ मिळणार आहे.

## साप्ताहिक सामाजिक आढावा वर्तमानपत्राचा प्रकाशन सोहळा डॉ. श्रीपाल सबनीस सर यांच्या शुभहास्ते संपन्न



पुणे : दिनाक ६ डिसेंबर २०२५ रोजी सामाजिक आढावा या साप्ताहिक वर्तमान पत्राचे प्रथम अंक प्रकाशन सोहळा ज्येष्ठ विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस सर यांच्या शुभहस्ते मोठ्या आनंदात पार पडला, यावेळी ज्येष्ठ पत्रकार महर्षी जयराम देसाई, डॉ. आनंद महाजन, श्री. विलास कसबे, श्री. विजय बेडेकर, आकाश पवार, कवी जयवंत पवार, श्रीवल्लभ कालेकर (पत्रकार), संपादक दिनेश चंद्र (हडपसर एक्सप्रेस), संपादक राजू शिंगाडे (जनलोक वार्ता), गोरख गाडे (पत्रकार), राजेंद्र वाव्हळ, जावेद मुजावर, श्रावणी कालेकर, तसेच सामाजिक आढावा या साप्ताहिक वर्तमानपत्राचे संपादक / मालक / प्रकाशक विनायक विलास कालेकर व मुद्रक सारस्वत आर्ट्स अँड प्रिंट्स चे मालक सौ. अलका विनायक कालेकर हे उपस्थित होते.

जेष्ठ विचारवंत श्रीपाल सबनीस सर यांनी साप्ताहिकाच्या पुढील कार्यास शुभेछा दिल्या.

**ताज्या बातम्यांचा घेतलेला पाठपुरावा म्हणजेच... सामाजिक आढावा**

# संपादकीय...

## आमचे बाबा गेले.....

१ जून १९३० रोजी पुण्यात जन्मलेले डॉ. बाबा आढाव यांचे आयुष्य संघर्षातून उभे राहिले. त्यांचे शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण पुण्यात झाले. १९४९ मध्ये मॅट्रिक्युलेशन उत्तीर्ण झाल्यावर, त्यांनी वैद्यकाची पदवी घेतली. तीन महिन्यांचे असतानाच वडिलांचे छत्र हरपल्यावर आजोळीच लहानपण घालवल्यानंतर ते वयाच्या १२व्या वर्षी अर्थात १९४२ मध्ये राष्ट्र सेवा दलात दाखल झाले. रसायनशास्त्राची पदवी संपादन करून त्यांनी ताराचंद रामनाथ आयुर्वेद महाविद्यालयातून १९५२ मध्ये पदवी संपादन केल्यानंतर त्यांनी नाना पेठेतील घरी वैद्यकीय व्यवसाय सुरू केला. भाऊसाहेब रानडे, एस. एम. जोशी, ना. ग. गोरे, आणि राम मनोहर लोहिया यांच्या समाजवादी सिद्धांतांनी बाबा प्रेरित झाले. राष्ट्र सेवा दलात भाई वैद्य, पन्नालाल सुराणा, बापूसाहेब काळदाते यांच्यासह इतर समाजवादी नेत्यांसोबत त्यांनी काम केले.

ज्येष्ठ समाजवादी नेते आणि असंघटित कामगारांचे आवाज मानले जाणारे, 'सत्य सर्वांचे आदी घर, सर्व धर्मांचे माहेर' ही प्रार्थना जनमानसात रूढ करणारे, समता-न्याय-बंधुत्वाचा जागर करणारे, घरोघरी संविधान पोहोचवण्याचा संकल्प केलेले, कष्टकऱ्यांचे नेते म्हणून बाबा आढाव सर्वपरिचित होते. त्यांच्यावर फुफ्फुसात बिघाड झाल्याने पूना हॉस्पिटलमध्ये हृदयरोगतज्ज्ञ डॉ. अभिजित वैद्य व तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार सुरू होते. श्वास घेण्यास त्रास होत असल्याने त्यांना कृत्रिम श्वसन यंत्रणेवर ठेवण्यात आले होते. राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी दोन दिवसांपूर्वीच त्यांची हॉस्पिटलमध्ये जाऊन भेट घेतली होती. अखेर सोमवारी रात्री ८.२५ वाजता त्यांनी अखेरचा श्वास घेतला

त्यांच्या निधनाने महाराष्ट्रातील वंचित आणि शोषित घटकांना न्याय मिळवून देणारा एक ध्येयवादी लढवय्या नेता काळाच्या पडद्याआड गेला आहे. साने गुरुजी आणि एस. एम. जोशी हे त्यांचे मार्गदर्शक असल्याने, ते 'भारत छोडो' चळवळ आणि भारतीय स्वातंत्र्यलढ्यातही सक्रिय सहभागी होते. दलितांना पंढरपूर मंदिरात प्रवेश मिळावा, यासाठी १९४८ मध्ये झालेल्या आंदोलनात साने गुरुजींना बाबांनी मदत केली.

बाबा आढाव यांनी आपले संपूर्ण आयुष्य शोषित आणि वंचितांसाठी वेचले. १९७०च्या दशकात पुणे महापालिकेचे नगरसेवक म्हणून त्यांनी कारकीर्दीला सुरुवात केली. समाजवादी पक्षाचे सदस्य असलेल्या बाबांनी हमाल, रिक्षाचालक आणि कष्टकऱ्यांच्या न्यायहक्कासाठी 'रिक्षा पंचायत' आणि 'हमाल पंचायत'च्या माध्यमातून मोठे काम उभे केले. विषमता नष्ट करण्यासाठी त्यांनी राबवलेली 'एक गाव एक पाणवठा' ही मोहीम महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात अजरामर ठरली.

राज्यातील दुष्काळादरम्यान हमालांच्या हलाखीच्या परिस्थितीने व्यथित झालेल्या बाबांनी महागाई आणि अन्नधान्याच्या रेशनिंगविरुद्ध सत्याग्रह केला. त्यांनी तीन आठवडे तुरुंगवास भोगला आणि सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी वैद्यकीय व्यवसाय बंद करण्याचा निर्णय घेतला. महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी यांच्या लेखन व कार्यांनी प्रेरित होऊन त्यांनी महाराष्ट्रातील संघटित आणि असंघटित कामगार चळवळीत सहभाग घेतला. डॉ. आढाव यांनी नरेंद्र दाभोलकर आणि अंधश्रद्धा निर्मूलन समिती, स्वयंरोजगार महिला संघटनेसाठी अरुणा रॉय आणि नर्मदा बचाओ आंदोलन आणि प्रकल्पग्रस्त शेतकरी, पुनर्वसन परिषद यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांसोबत काम केले. आजवरच्या वाटचालीत त्यांना ५३ वेळा तुरुंगवास भोगावा लागला.

मुस्लिम सत्यशोधक मंडळ आणि देवदासी निर्मूलन परिषदेतही बाबा सामील झाले होते. १९८४ मध्ये त्यांनी गडहिंग्लज येथे पहिली देवदासी पुनर्वसन परिषद भरवली. १९८३ मध्ये त्यांनी प्रकल्पग्रस्त शेतकरी परिषदेची स्थापना केली. त्यांच्या अभूतपूर्व सत्याग्रहामुळेच देशात प्रथमच प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचा कायदा करण्यात आला. बाबांनी त्यांच्या कौटुंबिक जीवना पेक्षा सामाजिक सक्रियतेला प्राधान्य दिले. वयोमान वाढले तरी बाबांमधील कार्यकर्ता कधीच थकला नाही. राज्यात शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पडलेल्या फुटीनंतर, बिघडलेल्या राजकीय संस्कृतीविरोधात वयाच्या ९३व्या वर्षी त्यांनी रस्त्यावर उतरून आंदोलन केले होते. वारकरी सांप्रदायासाठी आळंदी येथे केलेले 'ताटी उघडा ज्ञानेश्वरा' हे आदोलन देखील उल्लेखनीय होते. एका ना अनेक असे सामाजिक विचारांना शासन दरबारी मांडणारे खरे समाजसेवक आज आपल्यातून गेले याचे संपूण महाराष्ट्रातील तळगाळातील लोकांना दुःख वाटत आहे. तरी त्यांचा कार्याचा आढावा घेताना केलेल्या अभ्यासात आमच्या सर्व टीमला अश्रू अनावर होत होते. सामाजिक आढावा कडून बाबांना भावपूर्ण श्रध्दांजली...

बुधवार चौकातील मजूर अड्यावरचा मजूर हळहळला.... पीएमसीच्या स्वच्छ चे कामगारांना अश्रू अनावर झाले......







## सामाजिक कर्तव्याच्या भावनेतून ध्वजदिन निधीमध्ये योगदान द्यावे

### विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार

माजी सैनिकांच्या प्रलंबित कामांसाठी प्रशासनाने 'एक खिडकी योजना' सुरु करावी

मातृभूमीची सेवा बजावताना वीरमरण आलेल्या, जखमी झालेल्या सैनिकांच्या कुटुंबियांचे पुनर्वसन करण्याकरीता प्रशासनासोबतच नागरिकांनी सामाजिक कर्तव्याच्या निस्वार्थ भावनेतून ध्वजदिन निधीमध्ये योगदान द्यावे, तसेच त्यांच्या प्रश्नासाठी जिल्हा प्रशासनाने 'एक खडकी योजना' सुरु करावी, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिले. जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयामार्फत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित सशस्त्र सेना ध्वजदिन २०२५ निधी संकलन शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते.

याप्रसंगी पुणे महानगरपालिका आयुक्त श्री. नवल किशोर राम, जिल्हाधिकारी श्री. जितेंद्र डूडी, अपर जिल्हाधिकारी श्री. सतीश राऊत, निवासी उपजिल्हाधिकारी श्रीमती ज्योती कदम, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त श्रीमती तृप्ती सांडभोर, जिल्हा उद्योग केंद्रच्या महाव्यवस्थापक श्रीमती अर्चना कोठारी, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल सतेश हंगे (नि.) उपस्थित होते.

विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार पुढे म्हणाले की, सैनिक अतिशय प्रतिकूल परिस्थितीत जीवाची पर्वा न करता देशाची सेवा करतात. जिल्हा प्रशासनाने ध्वजदिन निधी संकलनात कर्तव्य समजून आपले योगदान देवून त्यांच्या व कुटुंबियांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे. अनेक कार्यालयाकडून माजी सैनिकांना काही अडचणी आल्यास किंवा कामे होत नसल्यास आमच्या निदर्शनास आणुन द्यावे म्हणजे आम्ही त्यांचे निवारण करु. पुणे जिल्ह्याकरीता ध्वजदिन निधी संकलनाबाबत देण्यात आलेल्या उद्दिष्टपुर्तीसाठी जिल्हा प्रशासनाने पुढाकार घ्यावा. येत्या काही दिवसातच दुप्पट म्हणजे ६ कोटीहून अधिक रक्कमेचे ध्वजदिन निधी संकलन होईल, याकामी पुणे जिल्हा राज्यात प्रथम क्रमांकावर राहील, यादृष्टीने काम करावे, असे आवाहनही डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी केले.

महानगरपालिका आयुक्त श्री.नवल किशोर राम म्हणाले, सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाबाबत सर्व नागरीकांनी कृतज्ञता बाळगणे आवश्यक आहे. ज्यांनी आपल्या देशासाठी प्राणाची आहुती दिली आहे. त्यांच्या परिवाराच्या मदतीसाठी आपण सर्वांनी मिळून शासनाच्या सशस्त्र सेना ध्वजदिन निधी मार्फत कृतज्ञता व्यक्त करुया. तसेच त्यांच्या मुलांच्या भवितव्या करिता शासनाकडून रोजगाराच्या संधी कशा उपलब्ध होतील याची तजवीज केली जाईल.

जिल्हाधिकारी श्री.जितेंद्र डूडी म्हणाले, माझा देश व नागरिक सुरक्षित राहावे, याभावनेने देशाचे सैनिक देशाच्या सुरक्षितेकरीता आपल्या कुटुंबाला सोडून सीमेचे संरक्षण करीत असतात. देशा प्रती असलेले हे अत्युच्च बलिदान व असिम त्याग यापेक्षा दुसरे कोणतेही नाही. जिल्ह्यात माजी सैनिकांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. माजी सैनिक व त्यांचे पाल्य वास्तव्य करीत असतात. त्यांच्याकरीता कार्यालये, वसतीगृहे आहेत. माजी सैनिकांच्या पाल्यांना राज्य सरकाच्यावतीने शिष्यवृती देण्यात येते. माजी सैनिकांना सेवानिवृत्तीवेतन अदा करण्यात येते, वीर पत्नींना जमिनी दिल्या जातात, अशा विविध सोई सुविधा यापुढे उपलब्ध करुन त्यांचे पुढील जीवन सुखकर होईल, याकरीता जिल्हा प्रशासन सदैव प्रयत्नशील राहील. तसेच जमीनीची प्रलंबित प्रकरणे सोडविण्यात येतील अशी ग्वाही जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी दिली. सैनिकांचा आदर करने आपले कर्तव्य समजले पाहिजे, त्यांचा सन्मान केला पाहिजे, त्यांच्या सेवेतून आपण आदर्श घेतला पाहिजे, त्यामुळे सर्व कार्यालय प्रमुखांनी आपले कर्तव्य समजून ध्वजदिनात उत्सर्पूतपणे योगदान द्यावे, असे आवाहन श्री. डूडी यांनी केले.

प्रस्ताविकात जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल सतेश हंगे (नि.) म्हणाले, पुणे जिल्ह्याला ध्वजदिन निधी २०२४ करीता २ कोटी ९१ लाख रुपये इतके उद्दिष्ट शासनाकडून देण्यात आले होते. त्यानुसार रु. ३ कोटी ५ लाख ६२ हजार इतके संकलन झाले असून, १०५.०२ टक्के इतके उद्दीष्ट पूर्ण झाले आहे. सशस्त्र सेना ध्वजदिन निधीतून माजी सैनिक, दिवंगत सैनिकांच्या विधवा, पाल्यांकरिता विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. ध्वजदिन निधी हा माजी सैनिकांच्या कल्याणकारी योजनांसाठीच खर्च होत असल्याने जिल्ह्यातील सर्व सैनिक संघटनांनी देखील निधी संकलन करण्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

शेवटी कार्यक्रमात गेल्यावर्षी ध्वजदिन निधी संकलनासाठी उत्कृष्ट संकलन केलेल्या विविध संस्था, शासकीय कार्यालय यांना उत्तेजनार्थ प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला. तसेच माजी सैनिक व त्यांच्या गुणवंत पाल्यांना शाल व श्रीफळ देऊन विशेष गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.




## स.प.महाविद्यालय च्या 'सवंगडी' स्मरणिकेचे प्रकाशन माजी विद्यार्थी मेळाव्यात संपन्न : संपादक प्रवीण ढोरे

पुणे : पुण्यातील प्रसिद्ध अशा स.प. महाविद्यालयाच्या मुले व मुलीच्या वसतिगृहातील माजी विद्यार्थी विद्यार्थिनीचे शनिवार दिनांक २९ नोव्हेंबर २०२५ ला स्नेहमिलन पार पडले. शी. प्र. मंडळी व कॉलेज च्या सहकार्यातून हा सोहळा हॉस्टेल च्या प्रांगणात पार पडला. गेल्या ३० वर्षातील माजी विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होत्या. बरेच वर्षांनी पुन्हा हॉस्टेल.. मित्र मैत्रिणी ..हॉस्टेल ची खोली या सर्वांना भेटण्याचे भाग्य लाभले. या वेळी शी. प्र. मंडळी चे जैन सर, चितळे सर, पवार सर , वझे सर उपस्थित होते. प्राचार्य डॉक्टर मोहरील सर व रेक्टर राख सर यांनी भरपूर हातभार व मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात काही प्रशासकीय, क्रीडा, संगीत, उद्योग क्षेत्रातील माझी विद्यार्थी, विद्यार्थिनीचा सन्मान करण्यात आला.

याच वेळी 'सवंगडी' नावाची स्मरणिका संपादक प्रवीण ढोरे, केतन करंदीकर, शिल्पा भोजगुडे यांच्या प्रयत्नातून प्रसिद्ध करण्यात आली.

आयोजन कमिटी चे नेतृत्व सत्येंद्र मुंदडा यांच्या सोबत पद्माकर जगताप, सुनील जगताप, प्रवीण ढोरे, केतन करंदीकर यांनी केले. कार्यक्रमास योगेश देसाई व बाळासाहेब थिटे यांचे मार्गदर्शन लाभले.

प्राजक्ता गांगल यांनी अतिशय छान सूत्रसंचालन करून कार्यक्रमाची रंगत वाढवली. योगायोगाने कार्यक्रम हॉस्टेल चे माझी विद्यार्थी व माझी राज्यपाल व माझी खासदार श्री श्रीनिवास पाटील यांची उपस्थिती होती. त्यांनी त्याच्या वेळचे अनेक किस्सेही आपल्या छोट्या मनोगतात सादर केले.

कार्यक्रमाची सांगता स्नेह भाजनाने झाली व त्यात सध्या हॉस्टेल मध्ये राहत असलेल्या मुला मुलीनं समाविष्ट करून घेतल्याने रंगत वाढली .

या कार्यक्रमाच्या निमित्ताने सर्व माजी व आजी सेवक मंडळीना सन्मानित करण्यात आले. सर्वच उपस्थित मंडळी अतिशय आनंदी झाली होती.. व पुन्हा भेटण्याच्या निश्चयाने निरोप देण्यात आला. अश्या स्नेहमिलनातून जुन्या मित्र मैत्रिणींना भेटून प्रत्येकाला एक उत्साह मिळतो व सर्वजण अगदी नवचैतन्य घेऊन जाता

**सामाजिक आढावा** हे साप्ताहिक **मालक व प्रकाशक :** विनायक विलास कालेकर यांनी **मुद्रक :** सारस्वत आर्टस् ॲन्ड प्रिंटस्, ४६७ बुधवार पेठ, पासोड्या विठोबा मंदिराजवळ, तपकीर गल्ली, इलेक्ट्रिक मार्केट, पुणे ४११००२. महाराष्ट्र येथे छापून ४६७ बुधवार पेठ, पासोड्या विठोबा मंदिराजवळ, तपकीर गल्ली, पुणे ४११००२, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले आहे. न्यायलयीन कार्यक्षेत्र **पुणे न्यायालय** राहील **संपादक : विनायक विलास कालेकर, मोबाईल :** ९८९०३३६०११

Weekly **SAMAJIK AADHAWA** Published by Owner Mr. Vinayak Vilas Kalekar **Printed at Saraswat Arts and Prints**, 467 Budhwar Peth, Near Pasodya Vithoba Mandir, Tapkir Galli, Pune : 411002, Maharashtra And Published at 467 Budhwar Peth, Near Pasodya Vithoba Mandir, Tapkir Galli, Electric Market, Pune 411002, Maharashtra.Subject to Pune Jurisdiction **Editor :** Vinayak Vilas Kalekar
**Contact** 9890336011 | **E-mail :**samajikaadhawa@gmail.com | **Website :** www.samajikaadhwa.com | **Youtube :** Samajik Aadhawa | **PRGI : MHMAR/25/A3777**

# सामाजिक संस्थांचे कार्य

## कालेकर एज्युकेशन सोसायटी

### आमची नव्हे आपली K E S

सामाजिक कार्याची सुरुवात माझ्यासारख्या एका सामान्य माणसानी करावी असा कधी विचार सुद्धा केला नव्हता परंतु असाच एकदा बाहेर गेलो असता तिथे मला एक ठराविक रक्कमेचे म्हणजेच ४००० गुंडाळलेले बंडल सापडले आणि बरोबर पत्नी होती तिला दाखवले विचार आला की हे बंडल कुणाचे बरे पडले असेल काय करावे म्हणून पत्नी आणि मी थोडासा कोपऱ्यात जाऊन त्याच जागेवर थांबलो विचार केला की ज्याचे पडले असेल तो शोधत शोधत जर आला तर त्याचे त्याला आपण देऊन टाकावे बराच उशीर झाल्यानंतर कोणीही तिथे आले नाही आणि मग या पैशाचे काय करावे असा प्रश्न एकमेकांनी एकमेकांना केला तर त्यावेळी एक कल्पना सुचली की हे पैसे ज्याचे कोणाचे असतील त्याला आपण आता देऊ शकत नाही ना की हे पैसे आपण स्वतः करता वापरू शकतो तर याचा एक संकेत मानून या पैशांमध्ये स्वतःचेच तेवढेच पैसे घालून मी आणि माझ्या पत्नीने एक खाते उघडायचे ठरवले. ज्या ज्या वेळेस आपल्याला काही अशी रक्कम सापडेल त्या त्यावेळी तेवढ्याच रकमेची भर घालून या खात्यामध्ये आपण टाकावे आणि त्याचा उपयोग समाजासाठी करता यावा असे ठरवले. यानंतर आजपर्यंत नशिबाने कुणाचे पैसे हरवले आणि ते आम्हाला सापडले असे झाले नाही तरीसुद्धा एका वेगळ्या कार्याची सुरुवात संकेत म्हणून आम्ही त्यावेळी केली.

या सामाजिक कार्य करण्याकरता काय त्याला नाव द्यावे म्हणून विचार केल्यानंतर काही मित्रांच्या सांगण्यावरून त्याला केईएस म्हणजेच कालेकर एज्युकेशन सोसायटी म्हणून संबोधण्यात आले.

कालेकर एज्युकेशन सोसायटी एक सामाजिक संस्था ही संस्था स्थापन करण्यामागचा उद्देश असा होता की ज्या समाजाकडून आपण काही घेतले त्या समाजामध्ये आपण मोठे झालो, ज्या समाजाकडून आपण काही शिक्षण घेतले त्या समाजासाठी आपल्याकडून काही ना काही देता येणे आवश्यक आहे आणि ते देण्याकरता ही एक सामाजिक संस्था जी चॅरिटेबल ट्रस्टच्या द्वारे रजिस्टर करून सरकारमान्य घोषित करण्यात आली.

सर्वप्रथम या संस्थेद्वारे सन २००५ मध्ये अगदी लहान मुलांसाठी प्लेग्रुप म्हणजेच बालवाडी सुरू करण्यात आली जिचे नाव **हॅपी फ्लॉवर्स प्री प्रायमरी स्कूल** असे ठेवण्यात आले आणि या शाळेला लोकांनी भरभरून प्रतिसाद दिला एकामागून एक मुले घडत गेली आणि त्यानंतर नर्सरी ज्युनिअर केजी आणि सिनियर केजी चे वर्ग सुद्धा सुरू करण्यात आले. याकरता नाममात्र फी आकारण्यात येत होती आणि या फीद्वारे होणारा सर्व खर्च गेल्यानंतरचा नफा याचे काय करावे असा विचार केला असता याद्वारे पुढील सामाजिक कार्य सुरू करण्यात आले.

झालेल्या या नफ्याचे आपण इतर गरीब आणि होतकरू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती द्वारे वाटप सुरू करावी अशी एक कल्पना आली आणि मग आम्ही जवळपासच्या शाळेमधील शिक्षकांशी संपर्क साधून आठवी नववी आणि दहावी इयत्तेतील हुशार आणि होतकरू अशा तीन किंवा पाच विद्यार्थ्यांना छोट्या रकमेची एक स्कॉलरशिप सुरू केली. प्रत्येक वर्षी त्याच शाळेतील विद्यार्थ्यांना द्यावी असेही नव्हते त्यामुळे कधी रायगड जिल्ह्यातील शाळा कधी मावळ तालुक्यातील शाळा निवडण्यात आल्या आणि अशी स्कॉलरशिप देण्यात आली. यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांकरता काही स्पर्धा आयोजित करण्यात आल्या जसे चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा आणि या स्पर्धेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्याचे ठरवण्यात आले.

असेच करत असताना एक पुढील कल्पना सुचली ती म्हणजे **जागो भारत जागो** अभियानाची यामध्ये आठवी नववी आणि दहावी मधील विद्यार्थ्यांकरता विद्यालयातून महाविद्यालयाकडे जाताना घ्यावयाची काळजी याविषयी व्याख्याने द्यायला सुरुवात करण्यात आली. यामध्ये खास करून करिअर मार्गदर्शन नव्हते तर कॅरेक्टर मार्गदर्शन केले जात होते आणि ते सुद्धा आमच्या दोन कन्यांना बरोबर घेऊन. उद्देश असा होता की आमच्या कन्या ज्या नुकत्याच कॉलेजमध्ये किंवा महाविद्यालयामध्ये गेलेल्या आहेत त्यांनी अनुभवलेले त्यांचे विचार आठवी नववीतील विद्यार्थ्यांना ज्यांना विद्यालयातून महाविद्यालया कडे जावयाचे आहे त्यांना कळवावे आणि जिथे आपल्याला घडायचे आहे, तिथे आपला पाय घसरू न देता आपण सावरून लक्षाकडे किंवा ध्येयाकडे वाटचाल करणे आवश्यक आहे आणि स्वतःला घडविणे आवश्यक आहे याच द्वारे त्यांचे व्यक्तिमत्व घडवता यावे असे अभियान सुरू करण्यात आले. त्याला नाव दिले होते जागो भारत जागो. हे कार्यक्रम करत असताना सुद्धा तळेगाव, वडगाव, कामशेत, रायगड अशा विविध ठिकाणी असलेल्या शाळांमध्ये जाऊन आम्ही हे असे अभियान सुरू केले याला मुलांनी सुद्धा अतिशय उत्तम प्रतिसाद दिला आणि आजतागायत हे अभियान सुरू आहे.

यामध्ये आपण स्वच्छतेची आवड सुद्धा समाजामध्ये निर्माण करणे आवश्यक आहे असे वाटल्यानंतर **स्वच्छता अभियान** सुरू करण्यात आले आणि यामध्ये रेल्वे स्टेशन, एसटी स्टँड, गजबजलेले चौक, गडकिल्ले, महाबळेश्वर सारखे पर्यटन स्थळ, वरंधा घाटातील काही कानाकोपऱ्यात सुद्धा स्वच्छता अभियान करण्यात आले. त्याचबरोबर जवळपासच्या सोसायट्यांमध्ये जाऊन सुद्धा असे अभियान राबवण्यात आले आणि आज पर्यंत साधारणपणे पाच ते सहा हजार व्यक्तींना आपण स्वच्छतेची शपथ सुद्धा दिली आहे. हे अभियान करत असताना आम्ही ज्या ज्या ठिकाणी अगदी फिरायला जरी गेलो तरीसुद्धा आम्ही आमच्याबरोबर स्वच्छता शपथ आणि इतर साहित्य ठेवतो आणि अगदीच काही जमले नाही तर स्वच्छतेचे महत्त्व सांगून नागरिकांना स्वच्छतेची शपथ तरी देतो. यामध्ये अमरजाई माता मंदिर असेल, घोर वाडेश्वर संस्थान असेल किंवा इतरही काही ठिकाणी आज पर्यंत शपथ दिलेली आहे.

असे करत असताना मी आणि आमच्या सौभाग्यवती पूनम कालेकर ज्या या कालेकर एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा आहेत त्या स्वतः कविता करत असल्यामुळे विविध ठिकाणी कवी संमेलनाला आम्ही इतरत्र उपस्थित राहत होतो मात्र त्यानंतर आम्ही दोघे कविता करत असल्यामुळे एकमेकांच्या विचारांती हळूहळू आपल्या जवळपासच्या नवोदित जेष्ठ कवींना घेऊन आपण स्वतःचा काव्यमंच का स्थापन करू नये म्हणून कालेकर एज्युकेशन सोसायटीच्या अंतर्गत **शब्दश्रीमंती काव्यमंच** स्थापन करण्यात आला आणि याद्वारे आजपर्यंत मासिक त्रैमासिक कवी संमेलने प्रत्यक्ष रूपात आयोजित करण्यात आली आणि याचेच रूपांतर कोरोना कालावधीमध्ये ऑनलाइन स्वरूपात कवी संमेलने घेण्यात आली त्यासाठी हॅप्पी इंडिया मोमेंट आणि हॅपी आयडिया हे युट्युब चॅनेल सुरू करण्यात आले यामध्ये अगदी परदेशातील काही कवींनी सुद्धा सहभाग दिला. हे सर्व करत असताना साहित्याची एक चळवळ उभारावी हाच एक उद्देश मनात होता त्यामुळे कधीही कोणाकडूनही कोणतेही चार्जेस किंवा कोणतीही फी याकरता आकारलेली नाही.

साहित्याची चळवळ फक्त चार कवी एकत्र येऊन आपल्या कविता सादर करून होणार नाही तर याकरता नवीन कविता करणारे. नवीन कवी तयार होणे आवश्यक आहे. या संकल्पनेतून कवी आपल्या दारी ही संकल्पना राबविण्यात आली ज्यामध्ये जेष्ठ कवी शाळेमध्ये जाऊन विद्यार्थ्यांना कविता कशी घडते, मला आलेले विचार कवितेमध्ये कसे रूपांतरित केले जातात, याचे थोडक्यात प्रशिक्षण आणि प्रॅक्टिकल देण्यात आले कविता सादर करण्यात आल्या आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे या विद्यार्थ्यांमध्ये सुद्धा लपून बसलेला कवी-कवयित्री बाहेर पडले आणि त्यांनी कविता करण्यास सुरुवात केली.

मध्यंतरीच्या काळात आपल्या या संस्थेतर्फे **हॅपी युनिटी स्टोअर** ही संकल्पना राबविण्यात आली याद्वारे सबका साथ सबका विकास या धर्तीवर **UNITY IS POWER** असे ब्रीद घेऊन ठरलेल्या मेंबर साठी होलसेल मार्केट मधून वस्तू आणून त्या मेंबर यांना ना नफा ना तोटा या धर्तीवर वस्तू विकण्यात आल्या उद्देश असा होता की एखादी वस्तू एकट्याने खरेदी केल्यास ती नक्कीच नेहमी महाग पडते परंतु ती जर वस्तू एकत्र मिळून खरेदी केल्यास कशी स्वस्त मिळू शकते हे दाखवून देणे होता.

यानंतर आपल्या कालेकर एज्युकेशन सोसायटीतर्फे काही सामाजिक संस्थांना मदत फुल ना फुलाची पाकळी मदत म्हणून करण्यात आली यामध्ये सामुदायिक विवाह सोहळ्याकरता आपल्या संस्थेच्या वतीने गेले दोन वर्षापासून एक ठराविक रक्कम देण्यात येते की ज्यामध्ये गरीब नागरिकांचे विवाह त्या संस्थेद्वारे लावले जातात.

हे सर्व करत असताना पुढे जाऊन अजून एक नवीन विचार मनात घोळत होता तो म्हणजे.. आपल्या भारताचे उज्वल भविष्य जर आपल्याला हवे असेल तर सुजाण नागरिक होणे बनणे आवश्यक आहे आणि याच प्रबळ इच्छाशक्तीतून वीस वर्ष शाळेच्या अनुभवातून.. आपण आपल्या सहकाऱ्यांना निश्चितच उत्तम मार्गदर्शन करू शकू आणि एक आदर्श शिक्षिका बनवण्याचे नक्कीच प्रयत्न करू म्हणजे विद्यार्थी सुद्धा नक्कीच चांगले घडू शकतील घडतील या माध्यमातून उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (बारावी) पास झालेल्या मुलींसाठी आणि महिलांसाठी हॅप्पी फ्लॉवर्स टीचर ट्रेनिंग कोर्स ची सुरुवात झाली आणि या सर्टिफिकेट कोर्समधून आत्मविश्वासी आणि स्वावलंबी शिक्षिका बाहेर पडत आहेत आणि आपले भविष्य घडवत आहेत याचाही एक वेगळा आनंद आम्हाला मनोमन मिळत आहे. असे अनोखे उपक्रम आपल्या कालेकर एज्युकेशन सोसायटी अंतर्गत कार्यरत आहेत आपण सर्वांनी या कार्याचा लाभ घ्यावा आणि आपली समाजाप्रती देशाप्रती सेवा वृद्धिंगत करावी हीच आपल्या कालेकर एज्युकेशन सोसायटी तर्फे विनम्र सदिच्छा!

आपल्या संस्थेच्या या कार्यात इतरही नागरिकांनी मित्र परिवारांनी नातेवाईकांनी काही मदत करण्याची इच्छा दर्शवली परंतु ते करणे म्हणजे असमानता निर्माण होऊ शकेल असा अंदाज आल्यामुळे आपण नवीन उपक्रम सुरू करण्यात आला ज्यामध्ये ज्यांना कोणाला आपल्या संस्थेच्या कारभारात मदत करावयाची असेल कॉन्ट्रीब्युशन करायचे असेल त्यांच्याकडून दरमहा रुपये दहा सरळ क्यू आर कोडद्वारे संस्थेच्या बँकेच्या खात्यात जमा करण्याचे आवाहन करण्यात आले आणि त्यांनी सुद्धा दरमहा रुपये १०/- जमा करण्यास सुरुवात झाली या उपक्रमाला नाव देण्यात आले वुई फॉर ऑल एक मदतीचा हात ज्याद्वारे जमा होणाऱ्या रकमेमधून आणि संस्थेच्या एकूण नफ्यातून आपण इतरही कार्य करण्याच्या विचाराला चालना मिळेल.

एका हाताने दिलेले दान दुसऱ्या हाताला ही कळू नये हे ज्ञात असताना ही माहिती देणे म्हणजे जाहिरात नव्हे तर प्रत्येकाला सामाजिक कार्याची आवड असतेच फक्त योग्य मार्ग मिळणे आवश्यक असते. याच करिता ही संस्था एक सुयोग्य दालन दर्शवित आहे .

अशा पद्धतीने कालेकर एज्युकेशन सोसायटी ही केवळ एज्युकेशन सोसायटी राहिली नसून आपले क्षेत्र विविध मार्गाने वाढविण्यासाठी नेहमी प्रयत्न करत आहे कार्य छोटे जरी असले तरी ते प्रभावी पद्धतीने करून पुढे प्रवाही राहण्याचा प्रयत्न करीत आहे. आपल्यापैकी कोणालाही या आमच्या कार्यामध्ये सहभागी व्हायचे असल्यास आपण सुद्धा रुपये दहा दरमहा आमच्या खात्यामध्ये जमा करू शकता त्यासाठी आमच्याशी संपर्क केल्यास आम्ही क्यूआर कोड पाठवू आणि या मोठ्या कार्यात आपले योगदान हे बहुमूल्य असेल. हे करीत असताना अट एकच की कोणीही वार्षिक योगदान रुपये १२० द्यावयाचे नाही तर दरमहा रुपये दहा देणे आहे सातत्य कंटीन्यूटी असणे आवश्यक आहे जेणेकरून दरमहा आपला संपर्क एकमेकांशी राहू शकेल याकरता दर महिन्याच्या दहा तारखेला किंवा त्यापूर्वी आमच्यातर्फे सुद्धा आपल्याला आठवण करण्यात येऊ शकेल. आपले हे छोटेसे योगदान मोठे सामाजिक कार्य नक्की घडवेल असा विश्वास आहे तसेच आपल्यालाही काही सामाजिक कार्य करावयाची इच्छा असल्यास या आमच्या संस्थेमध्ये आपले विचार व्यक्त करा. आपल्या कल्पना सुचवा आणि सहभागी व्हा सहकार्य करा WE FOR ALL एक मदतिचा हात

**श्रीवल्लभ कालेकर :९५१८९७२९४७**
**सौ पूनम कालेकर : ७८२२८६२४५७**

**कालेकर एज्युकेशन सोसायटी**

**सरकारमान्य प्री-पायमरी टीचर कोर्स**

*महिलांना स्वावलंबी बनण्याची सुवर्णसंधी*

**सर्टिफीकेट कोर्स**

**कालावधी फक्त ४ महिने**

**शिक्षण : १२ वी पास**

**सकाळी आणि दुपारी अशा २ बॅचमध्ये**

**आणि तेही आठवड्यातून दोनदा..**

**ठिकाण : तळेगाव दाभाडे (स्टेशन)**



**स्वावलंबी बना आणि भारताची नवी पिढी घडवा**

ॲडमिशन चालू आहेत त्वरित संपर्क करावा..

**अधिक माहितीसाठी संपर्क :**

7822862457
9518972947

# शासकीय धोरण/योजना

## केंद्रीय भुजल विभाग यांची "अटल भूजल योजना"

निसर्गात मानवी हस्तक्षेप वाढल्यामुळे निसर्ग ऋतुचक्रामध्ये मोठा बदल झाला आहे. यामुळे अवेळी पाऊस किंवा अतिवृष्टी कधी दुष्काळ अशा परिस्थितीचा सामना देशातील नागरिकांना करावा लागतो. त्यामुळे देशभरातील भूजल पातळी खोल जाताना दिसत आहे. ही भूजल पातळी चे संरक्षण करण्यासाठी आणि जमिनीतील पाणीसाठा वाढवण्यासाठी केंद्र सरकारने पुढाकार घेतला आहे.

जमिनीतील भूजल पातळी वाढवण्यासाठी आणि त्याच्या व्यवस्थापनासाठी नागरिकांचा सहभाग खूप महत्त्वाचा आहे. भूजल पातळी शाश्वत पद्धतीने वाढवण्यासाठी समुद्रामधील वर्तनातील बदलांना प्रोत्साहन देणे हा मुख्य उद्देश आहे.

या योजनेच्या माध्यमातून नागरिकांमध्ये भूजल पातळी बद्दल जनजागृती करणे. समुदायांना भूजल पातळी व्यवस्थापना बद्दल माहिती देणे आणि त्यांना भूजल पातळी वाढवण्यासाठी प्रोत्साहित करणे हा उद्देश आहे.

या योजनेमध्ये महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गुजरात, हरियाणा, कर्नाटक, राजस्थान, उत्तर प्रदेश यांचा समावेश करण्यात आला आहे.

या योजनेच्या माध्यमातून या राज्यांमधील ७८ जिल्ह्यातील सुमारे ८३५० ग्रामपंचायती चा समावेश भूजल पातळी व्यवस्थापनासाठी करण्यात आला आहे. ज्याचा या गावांना मोठा फायदा होणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ही योजना सुरू करत असताना अटल बिहारी वाजपेयी यांना त्यावेळी पाण्याचे महत्व लक्षात आले होते. त्यामुळे त्यांनी या नावाने आम्ही ही योजना सुरू केल्याचे त्यांनी म्हटले आहे. तसेच जल व्यवस्थापनासाठी त्यांचा दर दृष्टिकोनाची जाणीव करून देण्यासाठी आमचे सरकार कटिबद्ध असल्याचेही मोदी यांनी सांगितले.

या योजनेच्या माध्यमातून कमी झालेली भूजल पातळी वाढवणे हा मुख्य उद्देश आहे. भूजल पातळीत होणारी घट यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या अडचणीचा आणि टंचाईचा सामना करावा लागत आहे. शेतीसाठी उपयोग पाणी उपलब्ध व्हावे यासाठी अटल भूजल योजना प्रभावीपणे राबवण्याची पुढाकार घेण्यात आला आहे. या योजनेच्या माध्यमातून पाणी व्यवस्थापनाचे विविध पद्धतींचा वापर करून जमिनीत पाणी आठवले जाणार आहे. या योजनेचा महत्त्वाचा उद्देश म्हणजे भूजल व्यवस्थापनाची जबाबदारी घेण्यास नागरिकांना प्रोत्साहित करण्यात येणार आहे. शाश्वत पाण्याचा वापर वाढण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येणार आहे. नागरिकांमध्ये जलस्रोता विषयी जागृती करून त्यांचा दृष्टिकोन बदलण्यात येणार आहे. या आधारे नागरिक पाण्याचे व्यवस्थापन आणि संवर्धन करतील जेणेकरून जमिनीतील भूजल पातळी वाढण्यास मदत होईल.

**अटल भूजल योजनेचे महत्त्वाचे घटक :**

राज्यांमध्ये भूजल व्यवस्थापन करण्यासाठी उपाययोजना करणे त्यासाठी संस्थांना मजबूत करणे.

या उपायांमध्ये क्षमता निर्माण करणे पाणी वापरकर्त्यांच्या संघटनेचे बळकटीकरण करणे मॉनिटरिंग नेटवर्क मध्ये सुधारणा करणे. .

या माध्यमातून जमिनीतील भूजल पातळी वाढवण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

नवीन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सुधारित भूजल व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब प्रत्येक राज्याने करावयासाठी प्रोत्साहन देण्यात येत आहे.

या माध्यमातून डेटा प्रसार जलसुरक्षा योजना तयार करणे, तसेच सुरू असलेल्या योजनेच्या अभिसरणाद्वारे व्यवस्थापन हस्तक्षेपाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

राज्यामध्ये शाश्वत भूजल व्यवस्थापनाच्या माध्यमातून भूजल पातळी वाढवणे हा या योजनेचा मुख्य उद्देश ठेवण्यात आलेला आहे.

मुद्रक
SARASWAT Arts & Prints
Commercial - Industrial - School - Govt. - Corporate - Banking - Hospital Supplier
▲ Digital Ptg. ▲ Logo Design ▲ I - Card Mfg.
▲ Offset Ptg. ▲ Graphic Design ▲ File Mfg.
▲ Sticker Ptg. ▲ Website Design ▲ Envelop Mfg.
▲ Screen Ptg. ▲ Digital Mrktg. ▲ Brand Development
▲ Packaging Ptg. ▲ Social Media Mrktg ▲ Govt. Supplier
Brand Consultancy Services
496 Shaniwar Peth, Elina Apartment, Shop No. 9, Mehunpura Corner, Opp. Ashirwad Mangal Karyala, , Pune 30
Email : saraswatprints2020@gmail.com
Website : www.saraswatartsandprints.com
020-41257474 / +91-9890336011





**शासकीय कार्यालयांमध्ये निर्माण माहिती भांडाराचा स्थानीय भूजल पुनर्भरण प्रकल्पांत अधिकाधिक वापर व्हायला हवा: उपेंद्रदादा धोंडे**

> शासकीय कार्यालयांमध्ये निर्माण माहिती भांडाराचा स्थानीय भूजल विषयक प्रकल्पांत अधिकाधिक वापर व्हायला हवा यासाठी केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाच्या वतीने एक आश्वासक पाऊल उचलले गेले आहे. केंद्रीय भूजल विभाग, पुणे यांनी यासाठी एक कार्यशाळा आयोजित केली यावेळी बोलताना श्री. धोंडे यांनी हे वक्तव्य केले.

पुणे : केंद्रीय भूजल विभाग, राज्य एकक कार्यालय, पुणे यांच्या वतीने दि. ११ डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे 'केंद्रीय भूजल विभागांतर्गत निर्माण माहिती -संसाधनांचा प्रसार आणि उपयोग' या विषयावर तांत्रिक कार्यशाळेचे आयोजन केले. या कार्यक्रमाचे उद्घाटन श्रीमती ज्योती कदम, निवासी जिल्हाधिकारी, पुणे यांनी केले.

यावेळी श्रीमती परवीन कौर, वरिष्ठ भूजलवैज्ञानिक आणि कार्यालय प्रमुख, केंद्रीय भूजल विभाग, पुणे यांनी स्वागत भाषण सादर केले आणि केंद्रीय भूजल विभागाच्या माहिती संसाधन प्रसाराबाबत माहिती दिली.

श्री उपेंद्र धोंडे, वरिष्ठ भूजलवैज्ञानिक यांनी 'केंद्रीय भूजल विभागांतर्गत निर्माण माहिती - संसाधनांचा प्रसार आणि उपयोग' या विषयावर सविस्तर तांत्रिक सादरीकरण केले. या व्यतिरिक्त केंद्रीय भूजल विभागाच्या क्रियाकलापांची आणि राष्ट्रीय जलधर नकाशाकरण कार्यक्रम याबद्दलची सविस्तर माहिती असलेली एक पुस्तिका कार्यक्रमाच्या अध्यक्ष आणि इतर सहभागींसोबत वितरण करण्यात आली.

दुष्काळामुळे शेतकरी संकटात येत असला तरी दुष्काळाच्या झळा मात्र समाजातल्या प्रत्येक वर्गाला सोसाव्या लागतात. दुष्काळ जाहीर करत असताना शेती, पाणी आणि महसूल अशा तीन मुख्य निकषांवर विचार होतो आणि दुष्काळ कसा आहे ते ठरवलं जातं. राज्यात एकूण लागवड क्षेत्र, पर्जन्यमान, आणेवारी किंवा पैसेवारी असे निकष ऐकायला मिळतात. त्यातही पाणी हा निकष तपासताना 'भूजल' या विषयावर तशी सर्वात कमी चर्चा होते. आज तब्बल ८०,००० कोटींची अर्थव्यवस्था जी जमिनीखालील पाणी उपसणाऱ्या बोअरवेलवर अवलंबून असून, महाराष्ट्रात एकूण शेती, उद्योग आणि ईतर गरजांसाठी 'भूजलावरील अवलंबित्व' ८० टक्केहून अधिक असताना, भूजल विषयक चर्चा, प्रश्न आणि अभ्यास याबाबतीतली अनास्था, मागासलेपणा दुर्दैवी आहे.असे मत श्री धोंडे यांनी मांडले. त्यामध्ये रेनवॉटर हारवेस्टींगचा प्रचार व प्रसार तसेच अवलंबन होण्यासाठी अनेक प्रयत्न चालू आहे. तरी ही एक चळवळ स्वरूपात कार्य केले गेले पाहिजे. त्यासाठी भूजल विभाग सदैव तत्पर आहे अशी ग्वाही श्री. धोंडे यांनी दिली.

या तांत्रिक कार्यक्रमाचा समारोप श्रीमती व्ही. हेमलता, भुजल वैज्ञानिक यांनी आभार प्रदर्शन करून केला. या कार्यक्रमासाठी भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, लघुपाटबंधारे विभाग, मृदा व जल संवर्धन विभाग, एक्काडैम, भूजल अभियान, पाषाण एरिया सभा, फर्ग्युसन कॉलेज, जिल्हा परिषद पाणी पुरवठा विभाग आणि इतर अधिकारी उपस्थित होते. सहभागींकडून अत्यंत सकारात्मक अभिप्राय मिळाला, ज्यात लघू सिंचन विभागाकडून कृत्रिम पुनर्भरण योजनेत सहकार्याचा प्रस्तावही समाविष्ट आहे. या कार्यक्रमास यशस्वी करण्यासाठी श्री. संदीप वाघमारे, भूजल वैज्ञानिक, शुभांशू तिवारी, भूजल वैज्ञानिक, ओंकार कडेकर, पंकज वाणी, आलम खान, देवानंद बर्वे यांनी परिश्रम घेतले.



## महापुरूष अभिवादन कृती समितीतर्फे थोर समाजसेवक डॉ. बाबा आढाव यांच्या विचारांचे चिंतन व श्रध्दांजली ....

पुणे : महापुरूष अभिवादन कृती समितीतर्फे थोर समाजसेवक डॉ. बाबा आढाव यांचे चिंतन स्थळ महात्मा ज्योतिराव फुले वाडा येथे श्रध्दांजली वाहण्यात आली. याप्रसंगी श्री. दिपक पायगुडे आणि श्री. सुनिल माळी तसेच कृती समितीचे सर्व सभासद उपस्थित होते.

**'महत्मा ज्योतिराव फुले यांच्या विचारांचा खरा वारसदार अशा शब्दांत ज्यांचे वर्णन करता येईल असे डॉ. बाबा आढाव आज आपल्यातून हरपले'** असे उद्गार श्री. दिपक पायगुडे यांनी महात्मा ज्योतिराव फुले वाड्यात श्रध्दांजली वाहताना काढले. यावेळी अनेक सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. श्री. सुनिल माळी यांनी देखील बाबांच्या आठवणी सांगून श्रध्दांजली वाहीली. सामजिक कार्यात मनापासून झोकून काम करणारे आता कुठे मिळणार याचीच खंत वाटत आहे.

यावेळेस श्री. सुनिल माळी बाबांच्या आठवणी सांगताना बुधवार चौकातील मजूर अड्याचा जागेचा विषय असो की, पुण्यात दुष्काळ असताना केल्या जाणाऱ्या होमासाठी लागणारे धान्य वाचावे यावर केलेले उपोषण, झुणका भाकर केंद्र भाकरी थापणाऱ्या महिलांचे योग्य प्रबोधन असो, पुणे महानगर पालिकेच्या स्वच्छ कामागारांची घेतलेली बाजू आणि त्याच्या वरील लढा. हमालांनी कीती वजन उचलायचे यापासून ते त्यांच्या बोनस पर्यंत केलेला संघर्ष. अशा अनेक विचांरानी महात्मा फुले वाडा भारावून गेला होता. बाबा गेल्यामुळे एक सामाजिक विचार थांबला....

## "काव्य श्रीमंती"

छुम छुम छुम छुम छनन वाजे पैंजन
वाजे पैंजन पैंजन पैंजन ।। धृ ।।

दप्तर घेऊनी शाळेला जाताना
वाजते पैंजन छुम छुम...

शाळेत गेल्यावर अभ्यास करताना
नाय वाजत पैंजन छुम छुम....

खेळाच्या तासाला खेळ खेळताना
वाजती पैंजन छुम छुम....

शाळा सुटल्यावर घरी येताना
लई जोरात वाजती पैंजन छुम छुम...

सुट्टीच्या दिवशी घरांगणात खेळताना
वाजती पैंजन छुम छुम....

कांदबरी म्हणे शाळेतल्या मुलांनी
गुरूजींच्या चरणी मस्तक ठेवावे
छुम छुम छुम छुम छनगड वाजे पैंजन
वाजे पैंजन पैंजन पैंजन...

**कवयत्री : कु. कादंबरी र. जाधव**
**जि.प.शाळा, यवत स्टेशन, यवत**
**इयत्ता : ४ थी**

घमंड कशाचा ! आणि का रे
इथेच सोडून जाशिल सारे ।। धृ ।।

पैसा अडक, जमीन जुमला
आई, वडील, बायका, पोरे
इथेच सोडून जाशील सारे ।।

मी श्रेष्ठ, तु कनिष्ठ,
भेदभाव द्वेषाचा निखारे
इथेच सोडून जाशील सारे ।।

गरीबी अमीरी, पापपुण्याची शिदोरी
जमिनीवरची धुळ आणि
आकाशातील तारे
इथेच सोडून जाशील सारे ।।

मग कशाला हवाय अहंकार
आणि कशाला हवाय गर्व
एक माणूस म्हणून जग
सुरू कर माणुसकीचे पर्व
माणुसकीचे पर्व....

**कवी: श्री. नवनाथ चव्हाण**
**कात्रज. पुणे**
**मो.: ८३०८२०६८९०**

**वितरक व पत्रकार नेमणे आहे, तसेच लेख व जाहिराती साठी खालील इमेल वर संपर्क करावा**
**E-mail :samajikaadhawa@gmail.com**

या अंकात प्रसिध्द झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर प्रकरणे पुणे न्यायालयांतर्गत सोडवली जातील अन्य कोठेही नाही